राज्यातील नगरपरिषदांच्या
कामासाठी विशेष अनुदान देण्याची
योजना...............
निकष विहीत करणेबाबत..........

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
शासन निर्णय क्र. संकिर्ण - १०२०००/प्र. क्र. ४०/२०००/नवि-४
दि. : २५ फेब्रुवारी, २०००

प्रस्तावना :

राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात "प्राथमिक सुखसोईच्या विकासासाठी विशेष अनुदान" देण्याची राज्यस्तरीय योजना आहे. मात्र राज्यातील नगरपरिषदा संदर्भात "विकास योजना राबविण्यासाठी नगरपालिकांना सहाय्यक अनुदान" देण्याची जिल्हास्तरीय योजना आहे. या योजनेअंतर्गत केवळ विकास आराखड्यातील आरक्षण संदर्भातील कामांबाबत निधी उपलब्ध करून दिला जातो. या योजनेअंतर्गत जिल्हा नियोजन व विकास मंडळामार्फत बहुतांशवेळी अल्प तरतुदी केल्या जातात. ही वस्तुस्थिती आहे. अशा परिस्थितीत राज्यस्तरावरून महानगरपालिकांच्या धर्तीवर नगरपालिकांना सुध्दा वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान देण्याची योजना असावी ही बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती.

भारतीय संविधानातील ७४ व्या घटना दुरूस्ती अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्था संदर्भात घटनेत अंतर्भूत केलेल्या १२ व्या अनुसूचितील बाबी महा नगरपरिषदांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. अशा परिस्थितीत राज्य शासनाकडून सुध्दा महानगरपालिकेच्या धर्तीवर नगरपरिषदांना विशेष अनुदान देण्याची योजना अंमलात आणण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती. चालू आर्थिक वर्षात या योजनेसाठी रु. २.०० कोटी इतका नियतव्यय राखून ठेवण्यात आला होता. नविन योजना सुरु करण्याऐवजी सध्या अस्तित्वात असलेल्या "महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुखसोईच्यां विकासासाठी विशेष अनुदान" या योजनेची व्याप्ती वाढवून ही योजना नगरपरिषदांसाठी लागू करावी, व चालू आर्थिक वर्षात या योजनेसाठी मंजूर करण्यांत आलेला रु. २.०० कोटीचा निधी सध्या अस्तित्वात असलेल्या महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुखसोईच्या विकासासाठी विशेष अनुदान" या योजनेकडे वळता करावा असे ठरले.

शासन निर्णय :-

शासन या निर्णयाद्वारे राज्यातील "महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुखसोईच्या विकासासाठी विशेष अनुदान" देणे या योजनेची व्याप्ती वाढवून ही योजना खालील निकषावर राज्यातील सर्व नगरपरिषदांना लागू करण्यास मान्यता देत आहे.

निकष :-

अ) या योजनेअंतर्गत अत्यंत नाविन्यपुर्ण, अभिनव अशा स्वरूपाचे कामकाज नगरपरिषदेने हाती घेणे अपेक्षित असून अशा कामास प्राधान्य असावे. सदरहू काम, नगरपरिषदेच्या आवश्यक व स्वेच्छाधि कर्तव्याशी सुसंगत असावे.

उदा. घनकचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्प अथवा तत्सम जेणे करून पर्यावरण संबंधी राखले जाईल व दुहेरी फायदा होईल.

ब) या योजनेसाठी शासनाच्या इतर योजनेतून अनुदान प्राप्त झालेले नसलेस

क) एखादे अभिनव काम इतर योजनेअंतर्गत हाती घेतले असेल मात्र काही अपरिहार्य कारणांमुळे हे काम पुर्ण झाले नसेल तर अत्यंत अपवादात्मक प्रसंगी हे अपुर्ण अवस्थेतील काम पूर्ण करण्यांसाठी विशिष्ठ रक्कम देण्याची मुभा शासनास राहील. मात्र त्यासाठी उर्वरित कामांचे स्वतंत्र अंदाजपत्रक, सुधारित तांत्रिक मंजूरी इत्यादी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडून

_________ एकाच कामासाठी दुहेरी खर्च होणार नाही हे पाहण्याची जबाबदारी संबंधित नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांची असेल.

ड) सदर योजनेचा लाभ घेणाऱ्या नगरपरिषदेच्या प्रत्यक्ष सहभागाकरिता प्राप्त अनुदानाच्या १०% वर्गणी स्वत: भरणे आवश्यक आहे.

इ) सदर योजनेअंतर्गत हाती घेतलेले काम भांडवली स्वरूपाचे असावे. ज्यायोगे भविष्यात नगरपालिकांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होण्यासाठी कायमस्वरूपी उत्पन्नाचा स्त्रोत मिळवून देण्यांच्या दृष्टीने फायदेशीर राहील.

ग) ज्या नगरपरिषदांना स्वत:ची वास्तू अथवा इमारत नसेल त्या नगरपरिषदांना ह्या योजनेतून स्वत:ची वास्तू अथवा इमारत बांधकामासाठी अनुदान अनुज्ञेय राहील.

ख) या योजनेअंतर्गत नगरपरिषदांना अनुदान वितरित करतांना नगरपरिषदांची लोकसंख्या, क्षेत्रफळ व लोकसंख्येची घनता, मागील आर्थिक वर्षाचे उत्पन्न व खर्च तसेच आस्थापना खर्चाची एकूण उत्पन्नाची टक्केवारी इत्यादी बाबी विचारात घेण्यात येतील.

प्रस्ताव सादर करण्यांची कार्यपद्धती :

या योजनेअंतर्गत अनुदान अनुज्ञेय होण्यासाठी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने सक्षम सभेचा ठराव पारीत करून बांधकाम विषयक काम असल्यास रेखांकन/नकाशे संबंधित नगर रचना कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून मंजूर करून घ्यावेत. तसेच हाती घ्यावयाच्या कामांच्या अंदाजपत्रकास संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग, अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण किंवा नगर रचना विभागातील अंमलबजावणी कक्ष येथील सक्षम प्राधिकाऱ्यांची तांत्रिक मंजूरी घेणे आवश्यक राहील.

अशा प्रकारे रेखांकन मंजूरी तसेच तांत्रिक मंजूरी प्राप्त करून तयार करण्यात आलेला प्रस्ताव निधीच्या उपलब्धतेसाठी शासनास सादर करण्यात यावा व त्याची एक प्रत संबंधित उप संचालक, नगर रचना यांना माहितीस्तव सादर करण्यात यावी.

निधी वितरण विषयक कार्यपद्धती :

वर नमूद केल्याप्रमाणे शासनास सादर करण्यात आलेले परिपुर्ण प्रस्ताव, उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतुद, योजनेचे निकष, कामांचे स्वरूप इत्यादीं बाबींचा एकत्रित विचार करून निधीचे वितरण करण्यांत येईल. या योजनेअंतर्गत वितरीत निधीसाठी संबंधित विभागीय उपसंचालक, नगर रचना यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यांत येईल. या योजनेअंतर्गत प्राप्त निधी मुख्याधिकारी व अध्यक्ष यांच्या संयुक्त बँक खात्यावर ठेवण्यात यावा व या निधीचे विनियोग प्रमाणपत्र एक वर्षाच्या कालावधीत सादर करणे बंधनकारक राहील.

या योजनेअंतर्गत वितरीत करावयाचा निधी चालू आर्थिक वर्षात पुरवणी मागणीद्धारे विभागाच्या अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष/मागणी क्र. एफ-३-२२१७, नगर विकास, १९१, स्थानिक संस्था, महानगरपालिका नगर विकास प्राधिकरणे, नगर सुधार मंडळे इत्यादींना सहाय्य पंचवार्षिक योजनेअंतर्गत योजना (१०), महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुखसोईच्या विकासासाठी विशेष अनुदान (२२१७०९१३) या लेखाशिर्षाखालील अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार वितरीत करण्यात येईल.

सदरचा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ६८/२००० दि. २२/२/२००० व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १९९/व्यय-३, दि. २२/२/२०००, अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यांत येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(आकेला फातरपेकर)
महाराष्ट्र शासनाच्या सह सचिव.